**नि.फौ.ख.क्र. १५५/२०२५**

**सरकार –वि– साजन निमकर वगैरे**

**निशाणी क्र. २९**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – माधव श्रावण निमकर

वय – ४२

धंदा – मजूरी

राहणार – पिंपळणारे, ता. चांदवड, जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.२०.०६.२०२४ रोजी धन्वंतरी हॉस्पीटल पिंपळगाव येथे माझा जबाब घेतला नव्हता. आरोपींनी मला मारहाण केली होती. त्यामुळे मी दवाखान्यामध्ये अॅडमीट होतो. त्याबाबत पोलिसांनी माझा जबाब नोंदवलेला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मला आता तो जबाब दाखवण्यात आला. त्यातील मजकूराविषयी मला माहित नाही. त्यावर केवळ माझी सही आहे. सहीला **निशाणी ३०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. मी आरोपींना ओळखतो. ती माझी मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केल्यामुळे मी पो.स्टेशनला फिर्याद दिली होती. माझे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यंत झाले आहे. मला थोडे–थोडे लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही कागदावर वाचून सही करतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.०६.२०२४ रोजी रात्री १०:०० वाजता मी घरी असतांना माझ्यामध्ये व माझ्या पत्नीमध्ये बोलाचाली होती.

हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा तेथे आ.क्र. १ आला. मी त्याला म्हटले की, आमचा पती–पत्नीचा वाद चालू आहे. तु कशाला मध्ये पडतोस. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आ.क्र. १ ने बाहेरुन दगड आणून तो माझ्या डोक्यावर फेकून मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त येत होते, मी त्याच्या पाठीमागे गेलो असता तो पळून गेला.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटारसायकलवरुन आ.क्र. १ च्या मागे जात असतांना अचानक स्मशानभूमीजवळ आ.क्र. २ आला व त्याने मला पाठीमागून कवळी मारुन धरले. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. १ ने हातातील दगडाने माझ्या मांडीवर, हाताच्या कोपऱ्यावर मारले. हे म्हणणे खरे नाही की, मी आ.क्र. २ च्या तावडीतून सुटका करुन घेत असतांना आ.क्र. १ ने दगडाने मला पुन्हा डोक्यात मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या उजव्या डोळयाच्या भुवईजवळ लागून गंभीर दुखापत झाली होती.

५. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझी आरोपींच्या तावडीतून सरगम कडाळे, अजय गांगुर्डे यांनी सोडवासोडव केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला वडनेर भैरव येथील सरकारी दवाखान्यात नेले व तेथे प्रथमोपचार करुन चांदवड सरकारी दवाखान्यात पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या डोळयाला जबर मार लागल्यामुळे पुढील उपचारासाठी पिंपळगाव येथील धन्वंतरी हॉस्पीटलला पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, त्यासंदर्भात पोलिसांनी माझा नोंदवलेला होता. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ मी पोलिसांना सांगितला नव्हता.

६. मला आता जे फोटो दाखवण्यात आले. ते माझे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझी समजूत झालेली आहे. ते समजूत पत्र मला वकिलांनी वाचून दाखवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत समजूत झाल्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. एस. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझी समजूत झालेली असून तसे समजूत पत्र मी न्यायालयात माझ्या सहीने दाखल केलेले आहे.

त्यासाठी माझ्यावर कोणताही दबाव नाही. मला सदर प्रकरणत इतर कोणताही पुरावा द्यायचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरुद्ध मी केवळ गैरसमजूतीतून फिर्याद दिली होती. त्यामुळे मला सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.02.24 19:05:26 +0530

**दि. २४.०२.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**